सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,
धाराशिव
Phone No. –( 02472) 223388 Fax No.-(02472) 223377

जा.क्र.जिपउ/साप्रवि/ ने-2/कावि/ /२०२४ दिनांक- /०७/२०२४

# प्रसिध्दीपत्रक

## धाराशिव जिल्हा परिषद धाराशिव

## सरळसेवा पदभरती सन 2023- कनिष्ठ सहाय्यक (लि.व.) नियुक्ती बाबत

धाराशिव जिल्हा परिषद, धाराशिव अंतर्गत सरळसेवा पदभरती सन-2023 साठी जाहिरात क्र.1/2023 दि. 5/8/2023 चे अनुषंगाने विविध संवर्गातील 453 पदे सरळसेवा पदभरतीसाठी प्रस्तावित करण्यात आलेली होती. ज्यामध्ये कनिष्ठ सहाय्यक (लि.व.) या संवर्गातील 20 पदे भरणेसाठी IBPS मुंबई यांचेमार्फत घेण्यात आलेल्या Online परिक्षेअंती प्राप्त गुणवत्ता यादीप्रमाणे कागदपत्र पडताळणीनंतर दि.19/6/2024 रोजी पात्र/अपात्र उमेदवारांचे प्रसिध्द यादीबाबत प्राप्त आक्षेप/हरकती अंती कनिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) पदासाठी अंतिम निवड व प्रतिक्षा सुचीवरील उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या www.osmanabad.gov.in या संकेतस्थळावर दि. 25/07/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**कनिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) पदासाठी प्रवर्गनिहाय अंतिम निवड सुचीवर निवड झालेल्या उमेदवारांना सदर पदावर नियुक्ती देणेसाठी दिनांक 29/07/2024 रोजी सकाळी 10.00 वाजता जिल्हा परिषद धाराशिव येथे समुपदेशन प्रक्रिया आयोजित करण्यात आलेली आहे.**

**1) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव असलेल्या जागेवर निवड झालेले उमेदवार व अनु.जाती, अनु.जमाती मधील महिलांसाठी राखीव पदावर निवड झालेले उमेदवार या व्यतिरिक्त अन्य वि.जा.भ.ज., इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग यांचेसाठी राखीव असलेल्या महिलांच्या जागेवर निवड झालेल्या उमेदवारांची सदर पदावरील नियुक्ती ही त्यांनी सादर केलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राची आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग यांचेकडून तपासणीचे अधिन राहून करण्यात येणार आहे.**

**2) खेळाडू यांचेसाठी राखीव असलेल्या जागेवर निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही संवंधित उमेदवाराचे प्रमाणपत्राची शासन निर्णय 30 जून, 2022 नुसार मा.आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पुर्नपडताळणी प्राप्त अहवालानंतर करण्यात येणार आहे.**

**3) माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या जागेवर निवड झालेल्या उमेदवारांची सदर पदावरील नियुक्ती ही त्यांचे कागदपत्रांची सक्षम अधिका-यांकडून पडताळणी झालेनंतर प्राप्त अहवालानुसार करण्यात येणार आहे.**

**4) प्रकल्पग्रस्त पदावर निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही संबंधित उमेदवार यांचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची सक्षम प्राधिकारी यांचेमार्फत पडताळणीअंती प्राप्त अहवालाचे अनुषंगाने करण्यात येणार आहे.**

**5) दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर निवड झालेल्या उमेदवारांचे बाबतीत संबंधित उमेदवार सदर पदासाठी काम करण्यास पात्र आहे किंवा कसे याबाबत वैद्यकिय मंडळाकडून तपासणी करुन प्राप्त तपासणी अहवालाअंती नियुक्ती करण्यात येईल.**

**वरील 1 ते 5 वरील उमेदवार वगळता अन्य निवड झालेल्या उमेदवारांना दिनांक 29/07/2024 रोजी समुपदेशनाद्वारे कनिष्ठ सहाय्यक (लि.व.) पदावर नियुक्ती देण्यात येणार आहे.**

सबब कनिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) पदासाठी अंतिम निवड यादीप्रमाणे प्रवर्गनिहाय निवड झालेल्या उमेदवारांनी दि. 29/07/2024 रोजीच्या आयोजित समुपदेशनाने नियुक्ती प्रक्रियेसाठी वेळेवर उपस्थित राहणेबाबत सर्व उमेदवारांना याद्वारे जि.प.धाराशिव प्रशासनामार्फत आवाहन करण्यात येत आहे.

---

**( सुर्यकांत भुजबळ )**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
जिल्हा परिषद धाराशिव

**(डॉ मैनाक घोष भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद धाराशिव